सातारा जिल्हा परिषद,सातारा,ग्रामपंचायत विभाग.
दूरध्वनी क्रमांक ०२१६२-२३३८४३ ईमेल vptzpsatara2@yahoo.in

क्र.ग्रापं/५/कावि/७२५५ /२०१६, दिनांक ०१ /०८/२०१६

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती .... (सर्व),जि.सातारा

**विषय :- आमचं गाव आमचा विकास –ग्रामपंचायत विकास आराखडा नमुना आराखडा.**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेंबर,२०१५.
२) ग्रामपंचायत एकात्मिक माहिती कोष – ग्रामपंचायत पुस्तिका.
३) ग्रामपंचायत मार्गदर्शिका - पुस्तिका.

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५, व संदर्भ २ व ३ च्या पुस्तिकांमधील मार्गदर्शक सूचनांनुसार, आमचं गाव आमचा विकास या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायतींचे चार वर्षाचे (२०१६-१७ ते २०१९-२०) बृहत विकास आराखडे आणि वार्षिक विकास आराखडा तयार करण्यासंदर्भातील कार्यवाही ग्रामपंचायत स्तरावर सुरु आहे.

शासन निर्णयातील मुद्दा क्र.६.३ नुसार - दरवर्षी, पुढील वर्षाचा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी वेळापत्रक दिले आहे. सदर वेळापत्रकानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. तथापि मुद्दा क्र. ६.४.३ मधील सूचनांनुसार तसेच वेळोवेळी वरिष्ठ कार्यालयांकडून देण्यात आलेल्या सूचनांनुसार सन २०१६-१७ चा वार्षिक आराखडा आणि चार वर्षाचा बृहत विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पूर्वी पूर्ण करावयाची आहे. म्हणजेच दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पूर्वी ग्रामपंचायतींच्या पंचवार्षिक व वार्षिक विकास आराखडयास अंतिम मान्यता ग्रामसभेद्वारे द्यावयाची आहे. सदर सूचना यापूर्वी वेळोवेळी आपणास देण्यात आल्या आहेत. त्यानुसार आपलेकडून दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पर्यंत ग्रामपंचायतींचे प्रारुप आराखडे करणे, तांत्रिक छाननी करणे व ग्रामसभेद्वारे अंतिम मान्यता देणे इ.कार्यवाही पूर्ण होईल यादृष्टीने नियोजन करण्यात आले असेलच. कारण २०१६-१७ च्या वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडयाची अंमलबजावणीची सुरुवात डिसेंबर,२०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत करावयाची आहे.

उपरोक्त वेळापत्रकानुसार , सन २०१७-१८ या वर्षाचा वार्षिक विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया ऑगस्ट पासून सुरु करावयाची आहे. तथापि, सद्यस्थितीत पंचवार्षिक व २०१६-१७ चा वार्षिक विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर असलेने या प्रक्रियेदरम्यान सन २०१७-१८ चा वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यास हरकत नाही.

शासनाच्या दि.८ जून,२०१६ चे पत्रानुसार, पंचवार्षिक/वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा करताना केवळ १४ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या दुप्पट/दिडपट निधी विचारात घेवून आराखडे तयार करणेबाबतच्या सूचना आपणास अलाहिदा निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी व ग्रामपंचायतींना उपलब्ध असलेल्या अन्य स्त्रोतांतून (स्वनिधी, मनरेगा, स्वच्छ भारत अभियान, इ.)प्राप्त होणाऱ्या निधीमधून वरीलप्रमाणे दुप्पट अथवा दिडपट वाढ न करता मूळ तरतुदीनुसार आराखडे तयार करणे आवश्यक आहे. यासाठी त्या-त्या निधी/योजनांसाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, कायदे, शासन निर्णय लागू राहतील, याची नोंद घ्यावी.

पंचवार्षिक विकास आराखडा संदर्भीय शासन निर्णयातील मुद्दा क्र.६.६.१ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार करणे अपेक्षित असून वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा ग्रामपंचायत एकात्मिक माहिती कोष – ग्रामपंचायत पुस्तिकामधील पृष्ठ क्रमांक ५४ वर दिलेल्या नमुन्यात किंवा ग्राम विकास विभागाकडील मार्गदर्शिका पुस्तिका मधील पृष्ठ क्रमांक २६ वर दिलेल्या नमुन्यात करणे अपेक्षित आहे. (दोन्ही पुस्तिकातील नमुने एकच आहेत.) त्यानुसार आपलेस्तरावरुन आवश्यक सूचना ग्रामपंचायतींना व चार्ज ऑफीसर/प्रविण प्रशिक्षक यांना देण्यात आल्या असतील. काही तालुक्यातील प्रभारी अधिकारी तसेच प्रविण प्रशिक्षक यांचेकडून प्राप्त होणाऱ्या दूरध्वनीवरुन पंचवार्षिक व वार्षिक विकास आराखडे तयार करण्याच्या नमुन्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर संदिग्धता असल्याचे दिसून येत आहे.

वरील बाब विचारात घेऊन प्रभारी अधिकारी, प्रविण प्रशिक्षकांना पंचवार्षिक व वार्षिक आराखडे तयार करण्याचे प्रक्रियेसाठी सहाय्यभूत ठरतील असे नमुने तयार करुन यासोबत पाठविले असून, सदर नमुने सर्व संबंधित चार्ज ऑफीसर व प्रविण प्रशिक्षकांना उपलब्ध करुन द्यावेत. सदरचे नमुने प्रक्रिया सुलभ होण्यासाठी सहाय्यभूत ठरावेत यासाठी देण्यात आले असून कोणत्याही परिस्थितीत आपले तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे प्रारुप पंचवार्षिक व वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे ग्रामसभेच्या मान्यतेने प्राप्त झालेनंतर, गटस्तर छाननी समितीमार्फत तपासून ग्रामपंचायतींना परत पाठवून, ग्रामसभेची अंतीम मान्यतेची कार्यवाही दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पूर्वी पूर्ण होईल याची जबाबदारी आपले कार्यालयाची तसेच प्रभारी अधिकारी व ग्रामपंचायतींची राहील, याची नोंद घ्यावी.

सोबत-नमुना आराखडा.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
सातारा जिल्हा परिषद,सातारा